जनतेचा
# सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

Postal No - NMB/194/2025-27
Posted AT- koparkhairane Navi mumbai, Weekly Thursday

मुख्य संपादक : राजेंद्र बोडके : ९३२२५९२८१४

◆वर्ष : ५ ◆अंक : ३३ ◆नवी मुंबई / ठाणे / महाराष्ट्र ◆मंगळवार दि. २९ जुलै २०२५ ते ४ ऑगस्ट २०२५ ◆मराठी साप्ताहिक ◆पाने : ४ ◆किंमत : २ /- ◆RNI- MAHMAR/2020/79438

जनतेचा सावधान महाराष्ट्र या वृत्तपत्रासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण विभागासाठी पत्रकार व जाहिरातदार नेमणे आहे, अनुभवी व इच्छुकांनी खालील नंबरवर संपर्क साधावा.

## ऐरोली विभागात फेरीवाल्यांचा उच्छाद; सिलेंडर स्फोटानंतरही ऐरोली महानगरपालिका विभागाचे दुर्लक्ष - नागरिक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत!

**ऐरोली (जनतेचा सावधान महाराष्ट्र) : काही दिवसांपूर्वी ऐरोली विभागातील मुख्य रस्त्यावर एका फेरीवाल्याच्या हातगाडीवरील गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन मोठी दुर्घटना टळली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र या घटनेनंतर देखील 'ऐरोली महानगरपालिका विभागाचे दुर्लक्ष' स्पष्टपणे दिसून येत आहे. नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या हातगाड्यांवरील सिलेंडरचा वापर पुन्हा सुरू झाला आहे.**





















रोजंदारीवर काम करणाऱ्या हजारो नागरिकांना जीव मुठीत धरून घराबाहेर पडावे लागत आहे. ऐरोलीतील नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही 'महानगरपालिकेचे काही कर्मचारी आर्थिक स्वार्थापोटी जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप' नागरिक करत आहेत.

'कोपरखैरणे येथे कार्यरत असताना सहाय्यक आयुक्त सुनील कोठवळ यांनी दाखवलेली तत्परता आणि कायदेशीर कडक कारवाई ऐरोलीत का दिसून येत नाही?' असा सवाल आता उपस्थित होतो आहे. त्यामुळे ऐरोली महानगरपालिका विभागाने तत्काळ जागे होऊन फेरीवाले, हातगाड्यांवरील गॅस सिलेंडरचा वापर आणि अतिक्रमण यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

तसेच, ऐरोली विभागात अधिकृत गाळेधारकांकडून लाखो रुपये भाडे आणि महापालिकेला कर भरून व्यवसाय चालवले जात असताना, काही गाळेधारक मात्र आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत फुटपाथ व सार्वजनिक जागांवर बेकायदेशीररीत्या व्यवसाय करत आहेत. यातून अधिकृत व्यवसायिकांवर अन्याय होत असून महापालिकेच्या महसूलालाही धोका निर्माण झाला आहे.

या प्रकाराला 'ऐरोली महानगरपालिका विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांचा मौन पाठिंबा आहे', असा संशय नागरिक व्यक्त करत असून, या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून तात्काळ कारवाई करावी, अशी ठाम मागणी आहे.

'अतिक्रमण विभागाचे उपायुक्त डॉ कैलास गायकवाड या प्रकरणाकडे कशाप्रकारे लक्ष घालतात याकडे सर्व ऐरोली करांचे लक्ष लागले आहे?. की आता स्वतः महानगरपालिका आयुक्तांनाच ऐरोलीकरांच्या प्रश्नांकडे लक्ष घालावे लागणार आहे का?' असा सवाल देखील ऐरोलीतील नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

'ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त सुनील कोठवळ हे कर्तव्यदक्ष व निष्पक्ष अधिकारी म्हणून ओळखले जात असल्याने ऐरोलीकरांना पुन्हा एकदा न्याय मिळेल,' असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

''प्रशासनाने केवळ तक्रारी नोंदवण्यापुरतेच मर्यादित राहू नये, तर अशा जिवघेण्या परिस्थितीवर तात्काळ कृती करणे ही त्यांची जबाबदारी आहे. ऐरोली महानगरपालिका विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.''

**- संपादक : राजेंद्र बोडके**

**कोट**
''सर्व प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल.''
- सहाय्यक आयुक्त सुनील कोठवळ, ऐरोली विभाग



## आता सुट्टी नाही! अतिक्रमणांबाबत अजित दादांचे स्पष्ट निर्देश : सर्व विभागांनी ठोस भूमिका घ्यावी!

**पुणे:** पावसाळ्यात पुणे शहरासह उपनगरांमध्ये निर्माण झालेली वाहतूक कोंडी व जलतरणामुळे नागरिक त्रस्त झाले होते. विशेषतः हिंजवडी परिसरात पावसाच्या पाण्यामुळे झालेली तुंबळ अवस्था अजूनही अनेकांच्या स्मरणात आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी घेतलेल्या आढावा बैठकीत अतिक्रमणांच्या मुद्द्यावर ठाम भूमिका घेतली.

या बैठकीत अजित पवार यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे विशेष कौतुक करत सांगितले की, 'पीएमआरडीएने केलेल्या अतिक्रमण विरोधी कारवाईमुळे अनेक रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी झाली आहे. इतर शासकीय विभागांनीही याकडे गांभीर्याने पाहून अतिक्रमण हटविण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा.'

त्यांनी अधिकाऱ्यांना स्पष्टपणे निर्देश दिले की, कोणत्याही दबावाला बळी न पडता अतिक्रमण हटवण्यासाठी तत्काळ कारवाई करावी. सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणं ही केवळ वाहतुकीच्या अडचणींना कारणीभूत ठरत नाहीत, तर आपत्ती व्यवस्थापनासमोरही मोठं आव्हान निर्माण करतात, याची आठवण करून दिली. ▶ पेज नं. २

## नवी मुंबईत 'जनसंवाद' उपक्रमांतर्गत माजी आमदार संदीप नाईक यांचा नागरिकांशी थेट संवाद



**नवी मुंबई : राजेंद्र बोडके :** जनतेच्या प्रश्नांना त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'जनसंवाद' या उपक्रमांतर्गत माजी आमदार 'संदीप नाईक' यांनी नवी मुंबईतील विविध प्रभागांमधून आलेल्या नागरिकांशी थेट संवाद साधला. या संवादादरम्यान नागरिकांनी आपापल्या परिसरातील विविध अडचणी, समस्या आणि मागण्या स्पष्टपणे मांडल्या.

सदर उपक्रमात नागरिकांनी रस्त्यांची दुरवस्था, पाण्याचा अपुरा पुरवठा, नालेसफाई, शाळा - सुविधा, सार्वजनिक वाहतूक, ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा अशा अनेक मुद्यांवर प्रश्न उपस्थित केले. संदीप नाईक यांनी प्रत्येक मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष दिले असून संबंधित विभागांकडे पाठपुरावा करून या समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याची ▶ पेज नं. २

## कल्याणमधील कचोरे टेकडीवरील माती खचली, प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामांवर हातोडा मारण्याचे काम सुरू



**कल्याण :** कल्याण पूर्वेत कचोरे टेकडीवर सततच्या पावसामुळे माती घसरल्याने घरांची भिंत कोसळली. सुदैवाने जीवितहानी टळली, परंतु खबरदारी म्हणून प्रशासनाने टेकडीवरील अनधिकृत बांधकामांवर हातोडा मारण्यास सुरुवात केली आहे. तीव्र उतारावर घरे असल्यामुळे धोका निर्माण झाला असून, प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. ▶ पेज नं. २

## ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण - हेच आमचे ब्रीदवाक्य! - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**वर्धा (जनतेचा सावधान महाराष्ट्र) :** वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' या ब्रीदवाक्याला अनुसरून शिवसेनेची वाटचाल सध्या जोमात सुरू आहे. या विचारसरणीचे प्रत्यक्ष दर्शन वर्ध्यात नव्याने उभारण्यात आलेल्या शिवसेना जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी घडले. या उद्घाटन सोहळ्यात शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी कार्यकर्ते आणि नागरिकांशी थेट संवाद साधत पक्षाची भूमिका मांडली.

या कार्यक्रमात बोलताना नेत्यांनी विदर्भातील रामटेक लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचा खासदार निवडून दिल्याबद्दल जनतेचे आभार मानले. अमरावती, यवतमाळ हे शिवसेनेचे बालेकिल्ले असून, वर्ध्याच्या मातीतही शिवसेना रुजवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले.

गेल्या अडीच वर्षांतील शासनाच्या कामगिरीचा आढावा घेताना, महिलांसाठी 'लाडकी बहीण' योजनेद्वारे आर्थिक सक्षमीकरण, शेतकऱ्यांसाठी 'शेतकरी सन्मान योजना', एक रुपयात पीकविमा, नैसर्गिक आपत्तींमध्ये मदतीचे दुहेरी अनुदान, 'लेक लाडकी लखपती' योजना आणि मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण यांचा उल्लेख करत सर्वसामान्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न



केल्याचे नमूद करण्यात आले.

शिवसेनेचे कार्यालय हे सामान्य लोकांसाठी आशेचे केंद्र असले पाहिजे, असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले. शाखेत येणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या समस्येवर इथे उपाय मिळेल, असा विश्वास निर्माण व्हावा यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने कर्तव्यदक्षतेने काम करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. तसेच, या कार्यालयातून शिवसेनेची ध्येयधोरणे घराघरात पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला जाईल, अशी अपेक्षादेखील व्यक्त झाली.

या उद्घाटन सोहळ्यास जलसंधारण मंत्री संजय राठोड, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार नरेंद्र भोंडेकर, शिवसेना पूर्व विदर्भ संघटक किरण पांडव यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शिवसैनिक आणि वर्धा जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाकरे बंधूंच्या भेटीवर फडणवीसांचा टोला : महाराष्ट्राच्या मनात काय आहे, ते स्थानिक निवडणुकांमधून स्पष्ट होईल

**मुंबई :** (जनतेचा सावधान महाराष्ट्र) राज्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्र्यांमध्ये निर्माण झालेल्या अधिकारविषयक वादावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. ''राज्यमंत्री बैठका घेऊ शकतात, पण धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी कॅबिनेट मंत्र्यांची संमती आवश्यक असते,'' असं सांगत त्यांनी राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांच्यातील वादावर मत व्यक्त केलं.

माधुरी मिसाळ यांनी घेतलेल्या विभागीय बैठकीवर शिरसाट यांनी नाराजी दर्शवली होती. त्यानंतर मिसाळ यांनी पत्र लिहून, राज्यमंत्री म्हणून बैठका घेण्याचा अधिकार असल्याचं नमूद केलं. यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस म्हणाले, ''पत्र



लिहून वाद निर्माण करणं टाळावं. कुठली अडचण असल्यास ती थेट माझ्यापर्यंत आणावी, त्यावर चर्चा करून तोडगा निघू शकतो.''

राज्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्री हे एकाच सरकारचे भाग असून, दोघांमध्ये समन्वय असणं गरजेचं असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. या निमित्ताने महायुती सरकारमधील अंतर्गत विसंवाद पुन्हा समोर आला आहे.

दरम्यान, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या अलीकडील भेटीवरही फडणवीसांनी भाष्य केलं. ''उद्धवजींचा वाढदिवस होता, त्यानिमित्त राज ठाकरे शुभेच्छा द्यायला ▶ पेज नं. २

## बेलापूर परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त म्हणून अमित काळे यांची नियुक्ती

**नवी मुंबई : प्रतिनिधी :** नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या बेलापूर (परिमंडळ - २) पोलीस परिमंडळात पोलीस उपायुक्तपदी श्री. अमित काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी ते नवी मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त म्हणून कार्यरत होते. नवी मुंबई पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे यांनी ही नियुक्ती केली आहे.

बेलापूर परिमंडळाच्या नव्या पुनर्रचनेनुसार, या परिमंडळात एकूण ८ पोलीस ठाणी असणार असून त्यामध्ये दोन सहाय्यक पोलीस आयुक्तांचे अधिपत्य विभाग करण्यात आले आहे. बेलापूर विभाग अंतर्गत सीबीडी, एनआरआय, नेरुळ आणि प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ हे पोलीस ठाणी असणार आहेत. तर पोर्ट विभाग अंतर्गत उलवा, न्हावा शेवा, उरण आणि मोरा सागरी पोलीस ठाण्यांचा समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्त पदाची जागा रिक्त असून त्याठिकाणी अद्याप कोणतीही नियुक्ती करण्यात आलेली नाही. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचा दिल्ली दौरा सुरु असल्यामुळे ही नियुक्ती रखडली असून संबंधित पदावर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हालचाली सुरू असल्याची माहिती आहे.

नवीन परिमंडळ रचनेनुसार, वाशी परिमंडळात ७ पोलीस ठाणी असणार असून रबाळे विभागासाठी स्वतंत्र सहाय्यक पोलीस आयुक्त नियुक्त करण्यात येणार आहेत. त्यांच्या अधिपत्याखाली रबाळे, रबाळे एमआयडीसी आणि कोपरखैरणे पोलीस ठाणी असतील. तसेच वाशी विभागात वाशी, एपीएमसी, तुर्भे आणि सानपाडा पोलीस ठाणी येतील.

त्याचप्रमाणे परिमंडळ - ३ अंतर्गत खारघर विभागात खारघर, कळंबोली, कामोठे आणि तळोजा पोलीस ठाणी तर पनवेल विभागात पनवेल शहर, पनवेल तालुका आणि खांदेश्वर ही पोलीस ठाणी समाविष्ट असतील.

नवीन परिमंडळ रचना व नियुक्त्यांमुळे नवी मुंबईतील पोलीस कार्यप्रणाली अधिक कार्यक्षम व गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## संपादकीय

# नवा अभ्यासक्रम, जुनीच आव्हाने

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकविण्याचे वादग्रस्त धोरण रद्द करून याबाबत डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती नेमल्यानंतरही याबाबत अधून मधून राजकीय वक्तव्ये होत असल्याने हा विषय पुरता थांबलेला नाही. मात्र, तिसरी ते दहावी या इयत्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मसुद्यात तिसऱ्या भाषेचा उल्लेख नसल्याने तो आता थांबायला हरकत नाही.

हिंदीच्या सक्तीवरून शैक्षणिकच नव्हे, तर राजकीय वातावरणही ढवळले होतेय त्यामुळे हा मुद्दा या मसुद्यात नसणे स्वाभाविक म्हणायला हवे. डॉ. जाधव यांच्या समितीच्या शिफारशी येईपर्यंत आणि त्यावर सरकारचा निर्णय होईपर्यंत याबाबत विद्यमान पद्धत कायम ठेवण्याचे धोरण रास्त आहे. 'एनईपी'च्या मसुद्यातील भाषा, त्यातील शिक्षणविषयक चिंतन आणि काळानुरूप विद्यार्थी घडविण्याबाबतची कळकळ यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासारखे काहीही नाही. राज्यघटनेची आणि शिक्षण हक्क कायद्याची चौकट न मोडता सर्वांपर्यंत दर्जेदार शिक्षण नेणे हे खरे आव्हान आहे. अभ्यासक्रम नवीन येणार असला, तरी हे आव्हान जुनेच आहे. त्यामुळे 'एनईपी'त असलेल्या दोषांवर, विशेषतः शाळा संकुलांसारख्या किंवा भारतीय ज्ञानपरंपरेच्या नावाखाली काहीही शिकविण्यासारख्या मुद्द्यावर आणि एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या सहा टक्के रक्कम शिक्षणाला देण्यासाठी कटिबद्धता न दाखविण्यावर जाणकार बोट ठेवत आले आहेत. हे दोष दूर करून 'एनईपी' कशा पद्धतीने राबविले जाते, हे महत्त्वाचे आहे.

प्रस्तावित अभ्यासक्रम मसुद्यात सहावीपासून व्यावसायिक शिक्षण हा विषय स्वतंत्रपणे येईल. विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच विविध व्यवसायांचे आणि कौशल्यांचे शिक्षण देण्याबाबत दुमत असण्याचा प्रश्नच नाही. यापूर्वीच्या विविध शैक्षणिक धोरणांत हा मुद्दा येऊन गेला आहे. शालेय शिक्षणातही कार्यानुभवाचा समावेश पूर्वीपासून आहे. मात्र, दुर्दैवाने आपल्याकडे शालेय स्तरावर अशा विषयांना फारसे महत्त्व दिले जात नाही. आपली मुले ही भाषा, गणित, विज्ञान, समाजविज्ञान विषयांत प्रवीण व्हावीत, अशी बहुतेक पालकांची अपेक्षा असते. कार्यानुभव किंवा व्यावसायिक शिक्षण यांबाबत ते उदासीन असतात. म्हणून अनेक शाळांमध्ये या विषयांचे शिक्षण केवळ कागदोपत्री होतेय त्यांच्यासाठीच्या तासिका गणित किंवा अन्य विषयांसाठी वापरल्या जातात, असाही अनुभव आहे. त्यामुळे आता नव्याने सहावीपासून व्यावसायिक शिक्षणाचा समावेश केला गेला असला, तरी त्याच्या अंतिम फलनिष्पत्तीबाबत साशंकता आहे. हे विषय केवळ कागदोपत्री न राहता, प्रत्यक्षात घेतले जावेत, त्यांसाठीची प्रात्यक्षिके होतील आणि विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकता येईल असे वातावरण निर्माण व्हायला हवे. यांबाबत शिक्षकांची आणि पालकांचीही मानसिकता बदलायला हवी. तरच व्यावसायिक शिक्षण परिणामकारक होईलय अन्यथा ते कुचकामी ठरेल.

भारतीय ज्ञानप्रणाली, मूल्ये आणि स्वभाववृत्ती यांचा उल्लेख मसुद्यात असून, त्यांचा एकात्मिक स्वरूपात विचार करण्यात आला आहे. भारतीय ज्ञानपरंपरांच्या शिक्षणाबाबत घेतले जात असलेले आक्षेप दूर केल्यास आणि हा विषयही वेळापत्रकानुसार शिकविल्यास उपयुक्त ठरेल. तिसरी ते पाचवी या इयत्तांसाठीचा 'परिसर अभ्यास' हा प्रामुख्याने विज्ञान, इतिहास आणि भूगोल यांच्याशी संबंधित विषय आता 'आपल्या सभोवतालचे जग' या नावाने शिकविला जाईल. हा केवळ नावातील बदल राहणार नाही, हे पहावे लागेल. जिल्हा, राज्य आणि देश या क्रमाने इतिहासाचे शिक्षण असेल हे सांगताना चौथीसाठी सध्या असलेले 'शिवछत्रपती' हे पाठ्यपुस्तक आहे तसे चालू ठेवण्याची भूमिका रास्तच म्हणावी लागेल.

नववी आणि दहावी या इयत्तांसाठी अनुक्रमे समाजातील व्यक्ती आणि पर्यावरण शिक्षण हे पाठ्यक्रम स्वतंत्रपणे तयार करण्यात आले आहेत. संरक्षणशास्त्र, समाजसेवा, वाहतूक सुरक्षा आणि संरक्षण अशा अन्य विषयांचा उल्लेखही आहे. हे सर्व विषय महत्त्वाचे असले, तरी योग्य प्रमाणात आणि परिणामकारतेने ते शिकवायला हवेत.

या मसुद्यावर येणाऱ्या सूचनांचा स्वीकार करून, आवश्यक ते बदल करून अभ्यासक्रम प्रत्यक्षात येईल, हे पाहायला हवे.

पान नं. १ वरुन

## आता सुट्टी नाही! अतिक्रमणांबाबत अजित दादांचे स्पष्ट...

अजित पवार यांनी म्हटले की, 'अतिक्रमण काढण्यासाठी आता कोणतीही कारणं ग्राह्य धरली जाणार नाहीत. पावसाळ्यात पाणी साचण्यामागेही अतिक्रमण हेच मुख्य कारण आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून आणि नागरिकांना पूर्वसूचना देऊन नियोजनबद्ध पद्धतीने ही कारवाई करावी.'

यावेळी विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी, पीएमआरडीएचे आयुक्त आणि पोलीस प्रशासन उपस्थित होते.

या निर्देशानंतर अतिक्रमणाविरोधात मोठ्या प्रमाणावर मोहिम राबवली जाण्याची शक्यता आहे. प्रशासकीय यंत्रणेची जबाबदारी ठामपणे बजावत, अजित पवार यांनी अतिक्रमणासंदर्भातील कारवाईला नवसंजीवनी दिली असून, पुणे शहराच्या सुस्थितीसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

## कल्याणमधील कचोरे टेकडीवरील माती खचली,

कल्याण पूर्वेत कचोरे टेकडीवर सततच्या पावसामुळे माती घसरली. यामुळे टेकडीच्या उतारावर असलेल्या घरांची भिंत खाली कोसळली. सुदैवाने घरात कोणी नसल्याने जीवितहानी टळली. मात्र, खबरदारी म्हणून पालिका प्रशासनाने टेकडीवरील अनधिकृत बांधकामांवर हातोडा मारण्यास सुरुवात केली आहे, अशी माहिती सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी दिली. गेल्या चार दिवसांपासून कल्याणमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे.

कल्याण पूर्वेकडील कचोरे टेकडीवर दरड कोसळण्याची शक्यता असते. त्यामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीलाच प्रशासनाकडून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले जाते. मात्र, यावर्षी अजून कोणालाही हलवले नाही. जोरदार पावसामुळे सखल भागात पाणी साचले आहे. त्याचबरोबर दरड कोसळण्याच्या घटनाही घडत आहेत.

## 'नवी मुंबईत 'जनसंवाद' उपक्रमांतर्गत माजी आमदार संदीप नाईक यांचा नागरिकांशी थेट संवाद'

ग्वाही दिली.

झ ''जनतेच्या समस्या ऐकून घेणे हे माझे कर्तव्य आहे. या संवादातून जे प्रश्न समोर आले आहेत, त्यावर तातडीने कारवाई केली जाईल. नागरी सुविधांमध्ये सुधारणा करून नवी मुंबईकरांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवणे हेच आमचे ध्येय आहे,'' असे ''माजी आमदार संदीप नाईक' यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधान आणि आश्वासकता निर्माण झाली असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमधील दुवा अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले. 'जनसंवाद' हा उपक्रम आठवड्याच्या ठराविक दिवशी राबवला जात असून, नवी मुंबईच्या सर्व प्रभागांतील नागरिकांना आपल्या समस्या थेट मांडता येतील अशी संधी यामध्ये मिळणार आहे.

## ठाकरे बंधूंच्या भेटीवर फडणवीसांचा टोला...

गेले, यात राजकारण शोधू नये,'' असं सांगतानाच त्यांनी ठाकरे गटावर अप्रत्यक्ष निशाणा साधला. ''महाराष्ट्राच्या मनात काय आहे, ते विधानसभेच्या निकालात दिसलं, आणि तेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही दिसेल,'' अशा शब्दांत त्यांनी टोला हाणला.

''काही नेत्यांच्या मनात जे आहे, तेच संपूर्ण महाराष्ट्राचं मन आहे, असं समजणं चुकीचं आहे. तसं समजणं म्हणजे फार मोठं विधान ठरेल,'' असंही त्यांनी ठामपणे स्पष्ट ज्ञकेलं.

# दक्षिण मुंबईकरांची प्रतीक्षा वाढणार?

## मेट्रो-३ च्या अखेरच्या टप्प्यात सुरक्षा तपासणी सुरूच नाही




**मुंबई** : 'मुंबई बेट' म्हणून ओळख असलेल्या दक्षिण मुंबईकरांची मेट्रोची प्रतीक्षा लांबण्याची शक्यता आहे. भुयारी मेट्रो ३च्या अखेरच्या टप्प्यातील सुरक्षा तपासणी अद्याप सुरू झालेली नाही. त्यामुळे या मार्गिकेची ऑगस्टची मुदत हुकण्याची शक्यता आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) ही केंद्र व राज्य सरकारची संयुक्त कंपनी ही मार्गिका उभारत आहे.

मेट्रो ३ ही मुंबईच्या पश्चिम उपनगरांना उत्तर - दक्षिण जोडणारी मार्गिका आहे. तिचा आरे जेव्हीएलआर ते बीकेसी हा १० स्थानके व १२.९९ किमीचा पहिला टप्पा अडीच वर्षे विलंबाने मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये प्रवाशांसाठी सुरू झाला. यानंतर सहा स्थानके व १० किमीचा पुढील टप्पा धारावी ते आचार्य अत्रे चौक (वरळी नाका) असा होता. तोदेखील दोन महिने विलंबाने मे महिन्यात प्रवाशांच्या सेवेत आला. आता ११ स्थानके व १० किमीचा अखेरचा टप्पा हा महालक्ष्मी ते कफ परेड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस असा असेल. या टप्प्याद्वारेच ही मार्गिका खऱ्या अर्थाने उत्तर–दक्षिण जोडली जाणार आहे. हा टप्पा ऑगस्टमध्ये सुरू होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र त्यास विलंब होण्याची चिन्हे आहेत.

मार्गिका प्रवाशांसाठी सुरू करताना मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांच्या (सीएमआरएस) प्रमाणपत्राची गरज असते. त्यासाठी आयुक्तालयाकडून मार्गिका, त्यावरील स्थानके तसेच मेट्रो डबे यांच्या संचालनाची प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने कसून पाहणी होते. त्यांच्या अहवालानुसार मेट्रो उभी करणाऱ्या कंपनीला आवश्यक ते बदल करावे लागतात. त्यानंतर सीएमआरएसकडून सेवा सुरू करण्यासंबंधी प्रमाणपत्र दिले जाते. या सर्व प्रक्रियेसाठी संबंधित कंपनीने सीएमआरएसकडे अर्ज करून त्यांना निरीक्षणासाठी निमंत्रित केले जाते. सीएमआरएसना निमंत्रित करण्याआधी संपूर्ण गाडीची सर्व प्रकारची अंतिम चाचणी पूर्ण होण्याची गरज असते. या सर्व प्रक्रियेस किमान दीड ते दोन महिन्यांचा कालावधी लागतो. मेट्रो ३ बाबत अद्याप महालक्ष्मी ते कफ परेड यादरम्यान गाडीची अंतिम चाचणीच झालेली नाही. यामुळेच त्यांनी सुरक्षा प्रमाणपत्र निरीक्षणासाठी अद्याप सीएमआरएसना निमंत्रित केले नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

## पोलिसांचे निर्बंध असताना चोरवाटेने पांडवकडा धबधब्यावर गेला अन् प्रवाहात अडकला, बचावाचा भयानक थरार

**नवी मुंबई** : खारघर येथील पांडवकडा धबधब्यावर पर्यटकांच्या निष्काळजीपणामुळे पुन्हा एकदा थरारक घटना घडली आहे. आज, २५ जुलै रोजी एक २५ वर्षीय पर्यटक हा पांडवकड्याच्या खोल प्रवाहात अडकला. पोलिसांनी या ठिकाणी जाण्यास कडक बंदी घातलेली असतानाही, चोरवाटेने गेलेल्या या पर्यटकाला सुखरूप बाहेर काढण्यासाठी खारघर अग्निशमन दल आणि पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. मिळालेल्या माहितीनुसार, विकास पांडे (वय २५) हा पांडवकडा धबधब्यावर फिरण्यासाठी गेला होता. मुसळधार पावसामुळे धबधब्याचा प्रवाह वेगाने वाहत होता. तरीही, बंदी असलेल्या या ठिकाणी चोरवाटेने प्रवेश करून विकास धबधब्याच्या खोल भागात गेला. धबधब्याच्या प्रचंड प्रवाहमुळे त्याला तेथून बाहेर निघता आले नाही.

त्याने तात्काळ ११२ या आपत्कालीन क्रमांकावर कॉल केला. या कॉलवर तात्काळ प्रतिसाद देत बीट मार्शल तीनचे पोलीस अंमलदार अमोल आटोळे आणि राठोड हे घटनास्थळी पोहोचले. स्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी खारघर अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाने अत्यंत सावधगिरीने आणि कौशल्याने बचावकार्य हाती घेतले. अथक प्रयत्नांनंतर विकास पांडेला सुखरूपपणे बाहेर काढण्यात यश आले. त्याला तात्काळ प्राथमिक उपचार देण्यात आले असून, त्याची प्रकृती स्थिर आहे.

पांडवकडा धबधबा हा खारघर परिसरातील एक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. मात्र, पावसाळ्यात येथील खड्डे, खोल पाणी आणि तीव्र प्रवाह यामुळे हे ठिकाण अत्यंत धोकादायक बनते. गेल्या काही वर्षांत येथे अनेक अपघात घडले आहेत. या घटनांमुळे पोलिसांनी येथे जाण्यास कडक बंदी घातली आहे. तरीही, काही बेपर्वा पर्यटक चोरवाटेने येथे प्रवेश करतात, ज्यामुळे अशा दुर्घटना वारंवार घडत आहेत. राज्यात सध्या सर्वत्र मुसळधार पाऊस पडतोय. राज्यातील आठ जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात धबधबे, नदी किनारे अशा विविध पर्यटनस्थळी पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. तरीदेखील अनेकांकडून नियम धाब्यावर बसवून तिथे जाण्याचा प्रयत्न केला जातो. पण अशाप्रकारे जाणं हे जोखमीचं ठरु शकतं. अनेकदा दुर्घटना देखील घडल्या आहेत. पण त्यातून काही जण बोध घेण्यास तयार नाहीत. खारघर येथील घटना देखील त्यापैकीच एक आहे. पण सुदैवाने तरुणाचा जीव बचावला आहे.

## शहापूर हादरलं! आईला लेकी झाल्या नकोश्या, जेवायला दिलं अन..., तीन सख्ख्या बहिणींसोबत काय घडलं?

**ठाणे** : शहापूर तालुक्यात तीन अल्पवयीन बहिणींच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला कलाटणी मिळाली असून या मुलींच्या आईनेच जेवणातून तणनाशक औषध देऊन त्यांची हत्या केल्याची बाब ठाणे ग्रामीण पोलिसांच्या चौकशीमध्ये निष्पन्न झाली आहे. पोलिसांनी या आईला अटक केली आहे.

दहा, आठ आणि पाच वर्षांच्या तीन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाल्याप्रकरणी, आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मुलींना जेवणातून विषबाधा झाली, मात्र आईला काहीच त्रास न झाल्याने मुलींचे वडील, नातेवाईकांनी आईवर संशय व्यक्त केला होता. यानंतर सपोनि नितीन खैरनार यांनी चौकशी केली असता, मुलींच्या आईनेच हत्या केल्याची बाब उघड झाली. ही महिला आयुष्याला कंटाळली होती. मुलींच्या खर्चाचा ताण, त्यांना सांभाळण्याचा कंटाळा आल्याने तिने तणनाशक औषध जेवणातील वरणात मिसळले.

## ठाणे महापालिकेतील निविदा प्रक्रियेत बनवाबनवी : अधिकाऱ्यांकडून निविदा कालावधीत फेरफार, मनसेचा गंभीर आरोप



**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता समोर आली आहे. राज्य सरकारच्या आदेशांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप मनसेने केला आहे. अधिकाऱ्यांकडून निविदा कालावधीत फेरफार करून ठराविक ठेकेदारांना लाभ दिला जात आहे. वर्तक नगर प्रभाग समितीने जिद्द शाळेच्या डागडुजीच्या निविदेत नियमांचे उल्लंघन केले. दोन दिवसांसाठी निविदा काढल्याने संशय निर्माण झाला आहे.

ठाणे महापालिकेतील कोट्यवधींच्या निविदा प्रक्रियेत शबनवाबनवीश होत असून राज्य सरकारच्या आदेशांना केराची टोपली दाखवली जात आहे. अधिकाऱ्यांनी निविदा कालावधीत फेरफार केल्याचे समोर आले असून मर्जीतील ठेकेदारांना लाभ मिळवून देण्यासाठीच हा प्रकार सुरू असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

राज्य सरकारने विविध विकासकामांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी आणि दर्जेदार काम होण्यासाठी स्पष्ट अटी व शर्तीसह निविदा प्रक्रिया राबवण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक कामाच्या स्वरूपानुसार आणि अंदाजपत्रकाच्या मूल्याप्रमाणे टेंडर कालावधी निश्चित करण्यात येतो. मात्र, ठाणे पालिका क्षेत्रातील अनेक कामांमध्ये अधिकारी मनमानीपणे निविदेचा कालावधी बदलत असून काही खास ठेकेदारांना अवाजवी फायदा मिळत आहे.

विशेष म्हणजे, हे घोटाळे एखाद्या एकट्या विभागापुरते मर्यादित नसून विविध प्रभाग समित्यांमध्ये राबवण्यात येणाऱ्या कोट्यवधी रुपयांच्या कामांमध्ये हेच प्रकार सुरू असल्याचे माहितीमधून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हे घोटाळे हा केवळ निष्काळजीपणा नसून एक नियोजित आर्थिक गैरव्यवहार असल्याचा आरोप मनसेचे जनहित व विधी विभागाचे ठाणे शहराध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे. याबाबत पालिका प्रशासनाशी संपर्क साधूनही माहिती मिळू शकली नाही.

### नियमांना तिलांजली

ठाणे महापालिकेची विशेष मुलांसाठी आनंद दिघे यांच्या नावाने सिद्धाचल येथे जिद्द शाळा आहे. या जिद्द शाळेच्या डागडुजीकरिता शासनाच्या वतीने निधी वितरित करण्यात आला आहे. मात्र वर्तक नगर प्रभाग समितीच्या तत्कालीन अधिकारय़ांनी निविदा प्रक्रिया राबवताना नियमांना तिलांजली वाहिली असून ही निविदा चक्क दोन दिवसासाठी काढण्यात आली आहे. त्यामुळे या निविदेबाबत संशय व्यक्त होत आहे.


## मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेत गदारोळ

**मुंबई** : मुंबई विद्यापीठाची अधिसभा रविवारी स्थगन प्रस्तावामुळे वादळी ठरली. विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांनी एकच स्थगन प्रस्ताव मांडण्यास परवानगी दिल्याने युवासेनेच्या सिनेट सदस्यांबरोबरच अन्य सदस्यांनी त्याला विरोध केला. मात्र स्थगन प्रस्तावाबाबत कुलगुरू ठाम राहिल्याने युवासेना सदस्यांनी हा चुकीचा पायंडा पाडला असून, भविष्यात विद्यार्थ्यांचे प्रश्न अधिसभेमध्ये मांडलेच जाणार नाहीत, असा पवित्रा घेत सभात्याग करण्याचा निर्णय घेतला.

अधिसभेच्या अखेरीस शस्थगन प्रस्तावश घेण्याची कुलगुरू यांची मागणी अधिसभा सदस्यांनी मान्य केल्यानंतर दुपारच्या सत्रामध्ये स्थगन प्रस्ताव मांडण्यात आला. त्या वेळी एकूण आलेल्या २० स्थगन प्रस्तावांपैकी अतिमहत्त्वाचे व अत्यंत निकडीचे या निकषांखाली दोन प्रस्तांवाची निवड करण्यात आली. मात्र त्यातील फक्त एकच प्रस्ताव अधिसभेमध्ये सादर करण्यास कुलगुरूंनी मान्यता दिली. हा प्रस्ताव युवासेना सदस्य मिलिंद साटम यांचा होता. मात्र कुलगुरूंच्या या निर्णयाला अधिसभेतील सर्वच सदस्यांकडून विरोध करण्यात आला. या वेळी स्थगन प्रस्तावामध्ये उपस्थित करण्यात येणाऱ्या मुद्द्यांवरून अनेक जण न्यायालयामध्ये जातात. यामुळे विद्यापीठाची बदनामी होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, अन्य सर्व प्रस्तावांवर एकत्रित चर्चा करण्यात येईल. तसेच ही चर्चा पटलावर घेण्यात येईल, असेही कुलगुरूंकडून सांगण्यात आले.

यावर सिनेट सदस्य ॲड. अल्पेश भोईर यांनी विद्यापीठाच्या नियमावलीमध्ये फक्त एकच प्रस्ताव सादर करण्याबाबत कोणताही नियम नाही. तसेच विद्यापीठाच्या हितासंदर्भात असलेल्या स्थगन प्रस्तावावरून न्यायालयात जाता येऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्याथ्यर्थ्यांच्या हितासाठी फक्त एकच स्थगन प्रस्ताव न मांडता सर्व प्रस्तावांवर चर्चा करण्यात यावी, अशी भूमिका भोईर यांनी मांडली. मिलिंद साटम, प्रदीप सावंत व परम यादव यांनीही या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतली.

## अलिबागजवळ मोठी बोट दुर्घटना; ५ खलाशांनी तब्बल ९ तास पोहत समुद्र किनारा गाठला; खंदेरी किल्ल्याजवळ थरार



अलिबाग जवळ मोठी बोट दुर्घटना घडली आहे. अलिबागजवळ एक मच्छीमार बोट बुडाल्याची घटना घडली. यावेळी बोटीवरच्या ५ खलाशांनी तब्बल ९ तास पोहत समुद्र किनारा गाठला. खंदेरी किल्ल्याजवळ थरार पहायला मिळाला. मुसळधार पावसासह समुद्राला मोठी भरती येणार असल्याचा इसारी हवामान खात्याने दिला होता.

अलिबागजवळ खांदेरी किल्ल्याजवळ एक मच्छीमार बोट बुडाली. त्यावरील ५ खलाशांनी पोहत समुद्र किनारा गाठला आहे. त्या पाचही जणांना अलीबागच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत . बोटीवर एकूण आठ खलाशी होते. उर्वरित तीन खलाशांचा शोध सुरू आहे. शनिवारी सकाळी ७ वाजता करंजा येथील मच्छीमार बोट समुद्रात मासेमारी साठी निघाली. सकाळी आठ वाजता खांदेरी किल्ल्याजवळ आली असता ही बोट लाटांच्या जोरदार माऱ्याने बुडाली. बोटीवरील ५ खलाशांनी खवळलेल्या समुद्रात तब्बल ९ तास पोहून ते दिघोडी किनाऱ्यावर लागले. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने त्यांना रुग्णालयात आणले. मासेमारीवरील बंदी उठायला आणखी आठवडा बाकी असतानाच मच्छीमार बोटी समुद्रात गेल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. हवामान विभागाने लोकांना समुद्र किनाऱ्यावर जाऊ नये असे आवाहन केले होते. मुंबई, रायगड, पालघर, नवी मुंबई, ठाणे आणि कोकण भागात अधूनमधून मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

राज्यासाठी पुढील काही तास सतर्कतेचे असणार आहेत. राज्यातील अनेक जिल्ह्यांना पुढील २४ तासांसाठी हाय अलर्ट देण्यात आलाय. पुढील २४ तास अनेक जिल्ह्यांत अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर आणि विदर्भातील अमरावतीमध्ये वीजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. याठिकाणी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता आहे. परिणामी घाट परिसरातील तसेच नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

विभागीय कार्यालय : साईकृपा अपार्टमेंट E-1,/11, C-6 सेकटर 10, नेरुळ नवी मुंबई
विभागीय कार्यालय : रूम नं - J 155/156 से 2, ऐरोली नवी मुंबई

संपादक

सह संपादक : अरुण बिराजदार ९१ ९३२१८ ४७१३६
कार्यकारी संपादक : कुंडलिक कानगुडे ९१७-२१२-३०१३
उप संपादक : विक्रांत औटी ९६१९६२१२८७
कायदेशीर सल्लागार : ॲड.रचना एस. भालके. (B.Com,LL.B. M.Phil)
वकील उच्च न्यायालय

## पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आभा कार्ड व आयुष्मान कार्ड योजनेच्या लाभार्थ्यांच्या नोंदणीसाठी विशेष मेळावा

**पनवेल, (जनतेचा सावधान महाराष्ट्र):** एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यामध्ये विस्तारीत स्वरुपात राबविण्यात येत आहे. यासाठी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आभा कार्ड व आयुष्यमान कार्ड योजनेच्या लाभार्थ्यांची नोंदणी करण्याकरीता आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघरमध्ये विशेष मेळाव्यांचे आयोजन करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या मेळाव्यांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी केले आहे.

क्षेत्रनिहाय या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. आशा सेविका तसेच खारघरमधील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन या विशेष मेळाव्याची माहिती देण्यात येत आहे तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये देखील या मेळाव्यांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. याबरोबरच महापालिकेच्या अधिकृत सोशल मिडिया साईटवरही या वेळापत्रकाची माहिती मिळणार आहे. अशाप्रकारे महापालिका कार्यक्षेत्रातील इतर प्रभागांमध्ये देखील अशा प्रकारच्या आभा कार्ड व आयुष्यमान कार्ड योजनेच्या लाभार्थ्यांची नोंदणीसाठी विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

### आयुष्यमान कार्ड

१. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना एकत्रित करण्यात आली असून यामध्ये ५ लाखांपर्यंत विमा संरक्षण नागरिकांना मिळणार आहे. २. या योजनेत ९७१ शस्त्रक्रिया आणि उपचारात्मक प्रक्रियांचा समावेश आहे, ज्यामुळे विविध आरोग्य स्थितींसाठी व्यापक उपचार उपलब्ध होतात. ३. विविध श्रेणींमध्ये अनेक फॉलो - अप आरोग्य पॅकेजेससह, लाभार्थ्यांना सतत वैद्यकीय गरजांसाठी सतत काळजी मिळते. ४. मूत्रपिंड प्रत्यारोपणासारख्या महत्त्वाच्या प्रक्रियांसाठी २.५ लाख रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण मिळते. अशाप्रकारे, ही योजना व्यक्ती आणि कुटुंबांना विशेष आरोग्यसेवा प्रदान करते. ५. या योजनेद्वारे, लाभार्थी पूर्णपणे कॅशलेस आरोग्य विम्याचा आनंद घेऊ शकतात. यामुळे रुग्णालयात दाखल होताना कोणत्याही पेमेंट आवश्यकता दूर होतात.

### आभा हेल्थ कार्ड म्हणजे काय?

आभा कार्ड किंवा आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट कार्ड आहे. हा एक अद्वितीय १४ - अंकी ओळखे क्रमांक आहे जो तुमच्या वैयक्तिक आरोग्य नोंदी डिजिटल पद्धतीने संग्रहित करण्यात येत आहे. हे कार्ड नागरिकांच्या वैद्यकीय नोंदी संपूर्ण भारतातील आरोग्य सेवा प्रदात्यांच्या राष्ट्रीय डिजिटल प्रणालीशी सुरक्षितपणे जोडते. नागरिकांचा वैद्यकीय इतिहास एकाच प्लॅटफॉर्मवर संग्रहित करून ठेवते. आभा कार्ड भौतिक कागदपत्रांची आवश्यकता दूर करते





## गृहनिर्माण संस्था व वसाहती आणि त्यामागील गल्ल्यांमध्ये सखोल स्वच्छता मोहीमा

दैनंदिन सफाई करण्यात येत असलेल्या जागांव्यतिरिक्त 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' अभियानांतर्गत दुर्लक्षित जागांच्या स्वच्छतेकडेही बारकाईने लक्ष दिले जात असून आज आठही विभागात गृहनिर्माण संस्था, वसाहती व प्रामुख्याने त्यामागील गल्ल्यांमध्ये (Backlane) सफाईची विशेष मोहीम राबविण्यात आली.

या अंतर्गत नेरुळ विभागात से.२५ येथील सफल पार्क सोसायटी याठिकाणी अंतर्गत परिसर व पाठीमागील गल्ल्या यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे वाशी विभागातही नाखवा चौक वाशी गाव येथील वसाहतींचा परिसर आणि ग्रेन मर्चंट सोसायटी से.१७ वाशी परिसर व बॅकलेन या ठिकाणी सफाई मोहीम राबविण्यात आली.

तुर्भे विभागात मिलीनिअम टॉवर, से.९ सानपाडा आणि प्रभू आशिष सोसायटी से.२६ याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच कोपरखैरणे विभागातील सोसायटी व रहिवासी भागातही सफाई करण्यात आली.


घणसोली विभागात से.६ प्रोग्रेसिव्ह सोसायटी परिसरात व बॅकलेनमध्ये सखोल स्वच्छता करण्यात आली. ऐरोली विभागातही अय्यप्पा मंदिरा शेजारी से.१४ परिसरातील सोसायट्यांच्या भागात व मागील गल्ल्यांमध्ये सफाई मोहीम राबविण्यात आली.

सर्व ठिकाणच्या मोहीमांमध्ये नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता मित्र व स्वच्छता सखी यांच्या समवेत स्थानिक नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. आपण आपल्या परिसराचे व शहराचेही देणे लागतो या भावनेतून नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या मोहीमांमध्ये सहभाग घेतला. यावेळी स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. त्याचप्रमाणे उघड्यावर कचरा टाकू नये, कचऱ्याचे घरातच वर्गीकरण करावे व वेगवेगळा ठेवलेला कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतही वेगवेगळा द्यावा अशाप्रकारे सोसायटी वसाहतीमधील नागरिकांशी सुसंवाद साधून जनजागृती करण्यात आली.

नागरिकांवर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता करीत असल्याचे निर्देशनास आल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आली.

'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १ जुलैपासून दररोज स्वच्छता व आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत असून यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे.

## घणसोली विभागात अनधिकृत बांधकाम विरोधी तीव्र कारवाई



नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घ्घणसोली कार्यक्षेत्रातील श्री.जयवंत गायकर (घरमालक व विकासक), यांनी से.२१, घणसोली यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे आर. सी. सी., तळमजल्याच्या कॉलमचे काम सुरु केले होते व पहिल्या मजल्याचे स्लॅबचे काम प्रगतीपथावर असल्याचे दिसुन आले. संबधितांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम - ५४ अन्वये नोटिस बजावण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतरूहुन हटविणे आवश्यक होते. परंतु सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदरच्या ठिकाणच्या अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम ०७ कामगार, ०३ ब्रेकर यांच्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभाग कार्यालयातील अतिक्रमण विभागातील अधिकारी / कर्मचारी, तसेच पोलिस पथक तैनात होते.

यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## सोशल मीडियावर राहूल गांधींची बदनामी करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी

**नवी मुंबई (प्रतिनिधी) :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते व काँग्रेस नेते राहूल गांधी यांच्याबाबत सोशल मीडियावर अपप्रचार करणाऱ्यां विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी नवी मुंबई जिल्हा काँग्रेसचे प्रवक्ते रविंद्र सावंत यांनी नेरूळ पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकांकडे एका निवेदनातून केली आहे.

खासदार राहूल गांधी हे काँग्रेसचे वरिष्ठ नेते असून लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी जाहीर सभेत केलेल्या विधान प्रकरणी राहुल गांधी यांच्याविरुद्ध नाशिकमध्ये दाखल खटल्यात, अखेर नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयाने त्यांना गुरुवारी (दि.२४) जामीन मंजूर केला आहे. यापूर्वी गेल्या १ मार्च रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने त्यांना प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन पद्धतीने हजर राहण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार राहुल गांधी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे (व्हिसी) हजर होते. राहूल गांधी यांना न्यायालयाने जामीन दिलेला असताना काही समाजकंठक अपप्रवृत्ती समाजात तेढ निर्माण करण्यासाठी व कायदा - सुव्यवस्था खिळखिळी करण्यासाठी, राहूल गांधींची जाणिवपूर्वक प्रतिमा मलीन करण्यासाठी सोशल मीडियावर या खटल्याबाबत न घडलेल्या घडामोडी मांडून समाजव्यवस्थेत वाद निर्माण करत आहेत. राहूल गांधी यांनी माफी मागितली अशा पोस्ट पसरवून राहूल गांधी यांच्याबाबत अपप्रचार करत असल्याचे रविंद्र सावंत यांनी म्हटले आहे.

२५ जुलै २०२५ रोजी दुपारी १ वाजून २४ मिनिटांनी दत्तात्रेय सोसायटी सेक्टर २ च्या ग्रुप वर ९२२५९०२९८० या मोबाईल नंबरने एक पोस्ट आली काँग्रेस नेते आदरणीय राहुल जी गांधी यांच्या बद्दल त्यांचा फोटो आणि फोटो खाली खाली माफीवर आणि 'माय लॉर्ड मुझे जमानत दीजिए मै अंदर नहा रह सकता मै सावरकर नही हु' नाशिक कोर्टात वीर सावरकर



अपमान प्रकरणी राहुल गांधीने दूरध्वनी द्वारे माफी मागून १५ हजर रुपये भरून स्वत: ची जामीनावर सुटका करून घेतली माफी वीर राहुल गांधी... अशी बदनामीची पोस्ट होती आणि ती पोस्ट विनायक कुलकर्णी यांच्या नावाने फेसबुकवर तयार करण्यात आली असे दिसते. मुळात राहुल गांधी यांनी नाशिक न्यायालयात अशी फोन वरून कोणती ही माफी मागितली नाही, ही अफवा पसरवण्या मागे हेतू काय? सामाजिक माध्यमावर खोट्या बातम्या पसरवून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे राजकीय द्वेष वाढवणे हाच यामागे हेतू असल्याचे रविंद्र सावंत यांनी म्हटले आहे.

मुळातच जे न्यायालयात घडलेच नाहीत, ते घडल्याचा दावा करणाऱ्या पोस्ट समाजमाध्यमावर पसरवून राहूल गांधींची जनसामान्यांत प्रतिमा मलीन करणे, त्यांच्याविषयी समाजात गैरसमज निर्माण करणे, राजकीय वाद निर्माण करण्यास खतपाणी घालण्याचा हेतू यामागे असावा. आपण या समस्येचे गांभीर्य व समाजजीवनात वाद निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेवून आपण चुकीची पोस्ट समाजमाध्यमावर पसरविणाऱ्या संबंधितांना अटक करुन त्यांच्यावर खटला दाखल करण्याची मागणी रविंद्र सावंत यांनी केली आहे. सोबत नवी मुंबई काँग्रेस नेते संतोष शेट्टी, प्रवक्ते नासिर हुसेन, डॉक्टर मनोज उपाद्याय, श्रीमती विद्या ताई भांडेकर, कृष्णा पुजारी, तारानाथ शेट्टी, शांताराम शट्टी, उत्तम पिसाळ, प्रल्हाद गायकवाड व इतर काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते

## फकिरा पँथर सामाजिक संघटनेचा पोतराज व झाडु मोर्चा



दिनांक १ आँगस्ट २०२५ रोजी फकिरा पँथर सामाजिक संघटनेच्या माध्यमातून नवी मुंबई महानगर पालिका मुख्यालयावर पोतराज व झाडु मोर्चाचे आयोजन केले आहे. वंचित, पिडीत, शोषित समुहाचे साहित्यक डाँ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती करिता नवी मुंबई महानगर पालिकेने प्रतिवर्ष किमान पाच ते दहा लाख रुपयांची आर्थिक तरतूद करावी या मागणीसाठी फकिरा पँथर सामाजिक संघटना सन २०१६ पासुन नवी मुंबई महानगर पालिकेला मागणी करत आहे.परंतु मनपाने सदर मागणी बाबतीत उदासीन धोरणाचा अवलंब केला आहे. शेजारील बृहन्मुंबई महानगर पालिकेने प्रतिवर्ष लोकशाहीर डाँ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती साठी रुपये बारा लाख मंजुर केले आहे. ठाणे मनपाने प्रतिवर्ष पाच लाख रुपयांची आर्थिक तरतूद केली आहे. मीरा भांयदर मनपाने देखील पाच लाख रुपये मंजूर केले आहेत असा स्थितीत नवी मुंबई महानगर पालिका जाणीवपूर्वक फकिरा पँथर सामाजिक संघटनेच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहे याचा रोष व मागणीच्या पूर्ततेसाठी शुक्रवार दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळीरू १०.०० वा नवी मुंबई महानगर पालिकेवर पोतराज व झाडू मोर्चा धडकणार आहे.

आम्ही सन २०१८ मध्ये नवी मुंबई महानगर पालिकेच्या विरोधात सदर मागणीच्या पूर्ततेसाठी अमरण उपोषण केले होते .तत्कालीन महापौरनी आम्हाला अर्थिक तरतुदी बाबत अश्वाशित केले होते शिवाय सन २०१६ मधील आमच्या धडक मोर्चाला स्थगित करताना तत्कालीन आयुक्त श्री.तुकाराम मुंडे यांनी देखील मागणी पूर्तते बाबत शब्द देऊन पाळला नाही .या वेळेस आम्ही निर्णायक भुमिकेत आहे. सर्व बहुजन समाजानी हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे अव्हान आम्ही नवी मुंबईतील जनतेला करत आहे.

अॅड. गुरु सुर्यवंशी - संस्थापक / अध्यक्ष फकिरा पँथर महाराष्ट्र

## शहापूर हादरलं! आईला लेकी झाल्या नकोश्या, जेवायला दिलं अन..., तीन सख्ख्या बहिणींसोबत काय घडलं?

**ठाणे :** शहापूर तालुक्यात तीन अल्पवयीन बहिणींच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला कलाटणी मिळाली असून या मुलींच्या आईनेच जेवणातून तणनाशक औषध देऊन त्यांची हत्या केल्याची बाब ठाणे ग्रामीण पोलिसांच्या चौकशीमध्ये निष्पन्न झाली आहे. पोलिसांनी या आईला अटक केली आहे.

दहा, आठ आणि पाच वर्षांच्या तीन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाल्याप्रकरणी, आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मुलींना जेवणातून विषबाधा झाली, मात्र आईला काहीच त्रास न झाल्याने मुलींचे वडील, नातेवाईकांनी आईवर संशय व्यक्त केला होता. यानंतर सपोनि नितीन खैरनार यांनी चौकशी केली असता, मुलींच्या आईनेच हत्या केल्याची बाब उघड झाली. ही महिला आयुष्याला कंटाळली होती. मुलींच्या खर्चाचा ताण, त्यांना सांभाळण्याचा कंटाळा आल्याने तिने तणनाशक औषध जेवणातील वरणात मिसळले.


जनतेचा सावधान महाराष्ट्र — निर्भीड आणि निपक्ष

जाहिरातीचे दर

| पान नं. १ | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २०,०००/- |
| अर्धे पान | रु. १०,०००/- |
| पाव पान | रु. ६,२००/- |
| हार्दिक शुभेच्छा | रु. २,०००/- |
| जाहिर नोटिस | रु. ७००/- |
| श्रद्धांजली | रु. ५००/- |
| **पान नं. ४** | |
| पूर्ण पान | रु. १५,०००/- |
| अर्धे पान | रु. १०,०००/- |
| पाव पान | रु. ४,०००/- |
| हार्दिक शुभेच्छा | रु. १०००/- |
| जाहिर नोटिस | रु. ७००/- |
| श्रद्धांजली | रु. ५००/- |
| **पान नं. २ व ३** | |
| पूर्ण पान | रु. १०,०००/- |
| अर्धे पान | रु. ६,०००/- |
| पाव पान | रु. ३,०००/- |
| हार्दिक शुभेच्छा | रु. १०००/- |
| जाहिर नोटिस | रु. ७००/- |
| श्रद्धांजली | रु. ५००/- |

संपर्क

९३२२५९२८१४


## जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त सार्वजनिक स्थळांची लोकसहभागातून स्वच्छता

२८ जुलै हा दिवस विश्वभरात 'जागतिक निसर्ग संवर्धन दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. या माध्यमातून नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करणे व पर्यावरणविषयक जागरुकता वृध्दींगत करणे या उद्दिष्टांची पूर्तता केली जाते. म्हणूनच नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत जागतिक निसर्ग संवर्धन दिनाचे औचित्य साधून आठही विभाग कार्यालयीन क्षेत्रात सार्वजनिक स्थळांची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व श्रीम. स्मिता काळे आणि परिमंडळ १ उपआयुक्त श्री. सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपआयुक्त श्री. संजय शिंदे यांच्या निरीक्षणाखाली सर्व विभागांमध्ये सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या.

यामध्ये बेलापूर विभागात सहा.आयुक्त डॉ अमोल पालवे व स्वच्छता अधिकारी श्री. नरेश अंधेर यांच्या नियंत्रणाखाली से.१४ दिवाळेगाव जेट्टी याठिकाणी खाडी किनाऱ्यावर व खारफुटी परिसरातील प्लास्टिक, कागद व इतर कचरा संकलित करुन परिसर स्वच्छ करण्यात आला. यामध्ये स्थानिक रहिवाशांप्रमाणेच बेलापूर येथील भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व



विद्या उत्कर्ष मंडळ कॉलेज आणि रामशेठ ठाकूर कॉलेज खारघर येथील एनएसएस युनिटचे विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते.

नेरुळ विभागातही नेरुळ सेक्टर ६ पाम शेजारी सर्व्हिस रोड व त्याला लागून असलेला वजिरानी स्पोर्ट्सपर्यंतचा ग्रीन बेल्ट याठिकाणी सखोल स्वच्छता करण्यात आली. नेरुळ विभागाचे सहा. आयुक्त श्री. जयंत जावडेकर व स्वच्छता अधिकारी श्री. अरुण पाटील यांच्या नियंत्रणाखाली नागरिक व विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

वाशी विभागातही सहा.आयुक्त श्री. सुखदेव येडवे व स्वच्छता अधिकारी श्रीम. जयश्री आढळ यांच्या माध्यमातून से.८ येथील सागर विहार जेट्टी तसेच से.१० येथील मिनी सिशोअर होल्डींग पॉण्ड या दोन ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या. यामध्ये रहिवाशांप्रमाणेच केबीपी कॉलेज वाशी, फादर घ्नेल इंस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी व फादर ॲग्नेल स्कूल ऑफ लॉ येथील एनएसएस विद्यार्थी सहभागी झाले होते.

तुर्भे विभागात सानपाडा स्टेशनचा परिसर आणि से.१० जूईनगर येथील ट्रीबेल्ट याठिकाणच्या स्वच्छता मोहीमा सहा.आयुक्त श्री. सागर मोरे व स्वच्छता अधिकारी श्री. जयेश पाटील यांच्या नियंत्रणाखाली यशस्वीपणे राबविण्यात आल्या. यामध्ये एसआयईएस कॉलेज, स्टर्लींग कॉलेज, एसीपाटील कॉलेज, ओरिएंटल कॉलेज येथील एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सक्रीय सहभागी झाले होते.

कोपरखैरणे विभागातही सहा. आयुक्त श्री. भरत धांडे व स्वच्छता अधिकारी श्री. राजूसिंग चव्हाण यांच्या माध्यमातून कोपरखैरणे रेल्वे स्टेशन परिसरात राबविण्यात आलेल्या सखोल स्वच्छता मोहीमेत राफनाईक महाविद्यालय, टिळक कॉलेज, ज्ञानविकास महाविद्यालय येथील एनएसएस युनिटच्या विद्यार्थ्यांनी उत्फुर्तपणे सहभाग घेतला व परिसर स्वच्छ केले.

घणसोली रेल्वे स्टेशन परिसरातील सखोल स्वच्छता मोहीमेत घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या परिमंडळ २ उपआयुक्त श्रीम. स्मिता काळे सहभागी झाल्या होत्या. सहा.आयुक्त श्री. उत्तम खरात व स्वच्छता अधिकारी श्री. विजय पडघन यांच्या नियोजनानुसार संपन्न झालेल्या या मोहीमेत नागरिकांसोबतच टिळक कॉलेज, जे के कॉलेज व इंदिरा गांधी कॉलेज येथील एनएसएस विद्यार्थीही उत्साहाने सहभागी झाले होते.

ऐरोली से.२० येथील खाडी किनाऱ्या ठिकाणी राबविण्यात आलेल्या सखोल स्वच्छता मोहीमेत मेहता कॉलेज से २० येथील एनएसएस विद्यार्थी यांनी सहा.आयुक्त श्री. सुनिल काठोळे व मुख्य स्वच्छता अधिकारी श्री. राजेंद्र इंगळे यांच्या नियंत्रणाखाली नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व स्वच्छताकर्मीसह एकत्र येत नागरिकांच्या सहभागातून स्वच्छता मोहीम पार पाडली.

दिघा विभागात दिघा रेल्वे स्टेशन परिसर व पटणी मैदान परिसर याठिकाणी एसडीव्ही कॉलेजच्या एनएसएस युनिट मधील विद्यार्थ्यांनी सहा.आयुक्त श्री नैनेश बदले व स्वच्छता अधिकारी श्री. प्रविण थोरात यांच्या नियंत्रणाखाली सखोल स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबवली.

या स्वच्छता मोहीमेत प्राधान्याने प्लास्टिक बाटल्या, रॅपर्स, प्लास्टिक पिशव्या व सिंगल यूज प्लास्टिक, कापड, कागद अशा स्वरुपाचा कचरा संकलीत करण्यात आला. व गोण्यांमध्ये भरुन महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला. यावेळी स्वच्छता मोहीम झाल्यानंतर कचरा वर्गीकरणाचे महत्व पटवून देत स्वच्छतेची सामूहिक शपथ ग्रहण करण्यात आली. स्वच्छता व आरोग्य याचा परस्पर संबध लक्षात घेऊन जागतिक निसर्ग संवर्धन दिन पर्यावरणपूरक उपक्रमांतून उत्साहाने साजरा करण्यात आला. यामध्ये एनएसएस युनिटच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होत युवकांच्या मनात असलेली पर्यावरणविषयक जबाबदारी अधोरेखीत केली.

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

# अनधिकृत डेब्रीज टाकणाऱ्यांविरुद्ध सिडकोची कडक कारवाई : दोघा डंपर चालकांविरुद्ध गुन्हा दाखल

**नवी मुंबई (वैशाली बोडके) :** सिडको महामंडळाच्या संपादित व संपादन प्रक्रियेत असलेल्या जमिनीवर अनधिकृतपणे डेब्रीज टाकण्याच्या वाढत्या प्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी सिडको प्रशासनाने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर २२ जुलै २०२५ रोजी दुपारी ३:३० वाजता वाशी टोल नाक्यावर मोठी कारवाई करण्यात आली.

मुख्य दक्षता अधिकारी श्री. सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली सिडकोच्या दक्षता विभाग, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग व नवी मुंबई पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही मोहिम राबवली. कारवाई दरम्यान दोन डंपर - क्रमांक MH-43-CK-7681 आणि MH-43-CE-7258 - हे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसर व जासई - उलवे परिसरात अनधिकृतपणे धोकादायक डेब्रीज टाकण्यासाठी जात असताना आढळून आले.

डंपर चालक ईश्वर दिनु महतो (२९, रा. झारखंड) आणि जलील फरदीन चुंगीवाले (३७, रा. सोलापूर) हे पोलिस पाहताच वाहन टाकून पळून गेले होते. मात्र २५ जुलै २०२५ रोजी दोघांना शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. त्यांच्याविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्रमांक ०४१२/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २७१ आणि ६२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सिडकोने पुन्हा एकदा नागरिकांना आवाहन केले आहे की, सिडको क्षेत्रात अनधिकृत डेब्रीज टाकण्याचे प्रकार निदर्शनास आल्यास [www.cidco.maharashtra.gov.in] (http://www.cidco.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर किंवा संबंधित पोलिस ठाण्यात तत्काळ माहिती द्यावी, जेणेकरून अशा गैरप्रकारांवर कठोर कारवाई करता येईल.

# मा.मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व राजन विचारे यांच्या वाढदिवसानिमित्त नवी मुंबईत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप, वृक्षारोपण व जनजागृती रॅलीचे आयोजन

**कोपरखैरणे (जनतेचा सावधान महाराष्ट्र) :** महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि माजी खासदार मा. राजन विचारे यांच्या वाढदिवसानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ३१, कोपरखैरणे येथे एक भव्य सामाजिक उपक्रम पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने वृक्षारोपण करण्यात आले आणि विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेपासून अण्णासाहेब पाटील उद्यानापर्यंत काढण्यात आलेली जनजागृती रॅली. 'झाडे लावा, झाडे जगवा' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या रॅलीमध्ये शेकडो विद्यार्थी, स्थानिक नागरिक, महिला कार्यकर्त्या आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख रवींद्र बाबाजी म्हात्रे (दादा) आणि वजराई प्रकल्पग्रस्त महिला संघटनेच्या अध्यक्षा सौ. संपदा म्हात्रे यांनी केले होते. कार्यक्रमादरम्यान नवी मुंबईतील ज्येष्ठ नेते प्रवीण म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यासोबतच अनेक महिला संघटिका, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते, शालेय शिक्षक व पालकही उपस्थित होते.

या उपक्रमाद्वारे एक सकारात्मक सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या माध्यमातून भविष्यात अशाच उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येईल, अशी माहिती आयोजकांनी दिली.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने घरांवरील कारवाईविरोधात मोर्चा

**नवी मुंबई :** (जनतेचा सावधान महाराष्ट्र) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने माथाडी कामगार आणि अल्प उत्पन्न गटातील रहिवाशांनी (एलआयजी) गरजेपोटी बांधलेल्या घरांवर कारवाई करण्यात येऊ नये यासाठी ३१ जुलै या दिवशी सिडको आणि महापालिकेवर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चाची सुरुवात पाम बीच मार्ग सेक्टर ५० गंगारामशेठ तांडेल चौक येथून सकाळी १०.३० वाजता होणार आहे. या मोर्चा संदर्भात काढलेला पत्रकामध्ये म्हटले आहे की, सिडकोने ४० वर्षांपूर्वी नवी मुंबई मधील कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, तुर्भे, सानपाडा, नेरूळ या ठिकाणी माथाडी कामगार तसेच अल्प उत्पन्न गटातील रहिवाशांसाठी घरे दिली आहे. सध्या या ठिकाणी राहणाऱ्या कर्टबांचा कुटुंब विस्तार झाल्यामुळे अधिकचे काही मजले बांधून रहिवाशी कुटुंबासह येथे राहत आहेत. गरजेपोटी विस्तार केलेल्या स्थानिक भूमिपुत्रांची घरे, माथाडी वसाहत, एल.आय. जी येथील घरांवर न्यायालयाच्या आदेशाने महानगरपालिकेकडून वाढीव बांधकाम तोडण्यात येणार आहे. याबाबतची कारवाई अंतिम टप्प्यात आहे. त्याचीच पूर्वतयारी म्हणून गेल्या अनेक महिन्यांपासून अशा सर्व बांधकामधारकांना नोटीसा बजविण्याचे सत्र महानगरपालिकेकडून चालू करण्यात आलेले आहे.



### रहिवाशांमध्ये पसरले भीतीचे वातावरण

प्रशासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घरे तोडण्याची टप्प्या टप्प्याने नोटीस देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे रहिवाशांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण व जनजीवन लोक भयभीत आहेत या विस्कळीत झाले आहे. लोक भयभी संदर्भात उपाययोजना करण्यासाठी व आपली घरे वाचवण्यासाठी या मोर्चामध्ये सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

### अन्यायकारक निर्णय रद्द करण्याची मागणी

सर्वसामान्य कष्टकरी रहिवाशांनी ही घरे कर्ज काढून खरेदी केलेली असून त्यावरील बांधकामासाठी सुद्धा कर्ज घेतलेले आहे. त्यामुळे हा अन्यायकारक निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा. या संदर्भात शशिकांत शिंदे यांनी नागरिकांचे मेळावे आयोजित करून त्यांच्या समस्या जाणून घेऊन महाराष्ट्र शासन, नवी मुंबई महानगरपालिका तसेच सिडको यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. विधान परिषद सभागृहामध्ये हे सर्व विषय उपस्थित करून ते सोडवण्याच्या दृष्टिकोनातून आग्रही भूमिका मांडलेली आहे. त्यावर सरकारने सकारात्मक प्रतिसाद सुद्धा नि दिलेला होता. परंतु अद्यापपर्यंत त्यानुसार मंत्र आवश्यक कार्यवाही शासनाकडून झालेली नाही.

## खारघरमध्ये चोरीचे सत्र सुरूच

**पनवेल :** खारघर उपनगरात जुलै महिन्यात एका रात्रीत तब्बल ९ ठिकाणी झालेल्या घरफोडीनंतर खारघरच्या सुरक्षेचा प्रश्न पावसाळी अधिवेशनातही मांडण्यात आला. मात्र दोन आठवडे उलटले आणि खारघरमध्ये चोरटे पुन्हा सक्रिय झाले. १९ जुलैला एकाच दिवशी खारघर येथील सेक्टर १६ येथील साई शारदा सोसायटीमधील दोन घरफोड्यांचे प्रकार घडले.

यानंतर नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी खारघरप्रकरणी लक्ष घालण्याची गरज असल्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे. ३ ते ४ जुलैच्या रात्री खारघर परिसरात अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये बंद घरांचे कुलूप तोडून चोरटे घरात शिरले. हातामध्ये कोयता घेऊन ही टोळी इमारतीमध्ये शिरून बंद घरांना लक्ष्य करत होती. या चोरीमध्ये २० लाखांपेक्षा अधिकचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला, यानंतर दोन आठवड्यांतच चोरटे पुन्हा सक्रिय झाल्या.

# नवी मुंबई महापालिका कोपरखैरणे विभागाकडून अनधिकृत बांधकामावर निष्कासन कारवाई

## अतिक्रमण विभागाची कठोर भूमिका; नोटीशीनंतरही दुर्लक्ष केल्याने कारवाई

**नवी मुंबई - (जनतेचा सावधान महाराष्ट्र) :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कोपरखैरणे विभागातील खैरणे – बोनकोडे गाव, सेक्टर १२ डी येथे करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर आज निष्कासन कारवाई करण्यात आली. संबंधित श्रीमती कमला सी. राजपूत, उषा जे. राजपूत व जबरसिंह जे. राजपूत (घर क्र. २९०, २९१, २९२) यांच्या विरोधात ही कारवाई करण्यात आली आहे.




सदर कारवाई नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त मा. डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानुसार, अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. भरत धांडे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विभागाचे इंजिनीयर चंद्रकांत धोत्रे व कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आली.

संबंधितांना महाराष्ट्र प्रादेशिक योजना व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५४ अन्वये पूर्वसूचना व नोटीस बजावण्यात आली होती. परंतु, नोटीसीकडे दुर्लक्ष करून बांधकाम सुरु ठेवण्यात आले. त्यामुळे महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत आज सकाळी सदर ठिकाणी निष्कासनाची कारवाई राबविण्यात आली.

कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. भरत धांडे यांनी सांगितले की, 'नियमबाह्य व अनधिकृत बांधकामांना पालिकेमार्फत कोणतीही मुभा देण्यात येणार नाही. अशा प्रकारच्या बांधकामांवर भविष्यातही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.'

# कोपरखैरणे पोलिस ठाण्याच्या वतीने महिला संरक्षणासाठी विशेष बैठक

## महिला डिफेन्स व दक्षता समितीच्या सदस्यांचा सहभाग; आपत्कालीन उपाययोजनांवर भर

**नवी मुंबई, (जनतेचा सावधान महाराष्ट्र) :** महिलांवरील वाढत्या अत्याचार आणि हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर कोपरखैरणे पोलिस ठाण्याच्या वतीने महिलांसाठी सुरक्षितता उपाययोजनांबाबत विशेष बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत महिला डिफेन्स प्रशिक्षण घेतलेल्या सदस्यांसह महिला दक्षता समितीच्या सदस्यांनी सहभाग घेतला.

नवी मुंबई हे कोस्मोपॉलिटन शहर असल्याने येथे सर्व जाती - धर्माचे लोक शांततेने सहजीवन जगतात. मात्र काही समाजकंटक या शांततेला बाधा पोहोचविण्याचा प्रयत्न करतात. विशेषतः महिलांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत नवी मुंबई पोलिस प्रशासन अत्यंत संवेदनशील आहे.



श्रावण महिन्यात येणारे गोकुळाष्टमी (दहीहंडी) व गणेशोत्सव यांसारखे सण लक्षात घेता महिलांच्या सुरक्षितते संदर्भात राबवावयाच्या उपाययोजनांवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. महिलांनी आपत्कालीन परिस्थितीत, विशेषतः एकटे असताना, स्वतःची काळजी कशी घ्यावी, कायदेशीर मार्गाने कसे वागावे यावर मार्गदर्शन करण्यात आले.

या बैठकीत महिला सिव्हिल डिफेन्स व महिला दक्षता समितीच्या एकूण १५ ते १६ सदस्यांनी सहभाग घेतला. महिलांना पोलिसांकडून संरक्षण विषयक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. तसेच कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी त्वरित मदतीसाठी ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

सदर बैठक कोपरखैरणे पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक. औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी औदुंबर पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले असून, त्यांच्या कौतुकास्पद सहभागामुळे उपस्थित महिलांचे मनोबल वाढले आणि बैठकीस अधिक प्रभावी दिशा मिळाली.

# यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा; नवी मुंबई महानगरपालिकेचे आवाहन,

## बैठकीत अनेक मंडळांना मार्गदर्शन

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेने यंदा पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. या बैठकीत गणेशोत्सव मंडळांचे सदस्य, पोलिस, वाहतूक पोलिस, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि वीज वितरण कंपनीचे अधिकारी सहभागी झाले होते. गणेशोत्सव शांतपणे आणि नियमांनुसार व्हावा, यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.



गणेशभक्तांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन बैठकीत करण्यात आले. एकूण ६३ गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सव मंडळांचे सदस्य या बैठकीला हजर होते. यावेळी बोलताना आयुक्त डॉ. कैलास शिंदे म्हणाले, 'प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळा. पर्यावरणपूरक सजावट करा. सार्वजनिक तसेच घरातील गणेशमूर्ती सुद्धा पर्यावरणपूरक असाव्यात.'

गणेशोत्सव आणि नवरात्रौत्सवात ध्वनी प्रदूषण टाळण्याची सूचना देण्यात आली. यामुळे नागरिक आणि शाळकरी मुलांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे सांगण्यात आले. ज्या मंडळांनी मागील वर्षी परवानगी घेतली होती, त्यांची परवानगी ५ वर्षांसाठी ग्राह्य धरली जाईल. पण, या मंडळांना अग्निशमन दल, पोलिस आणि वाहतूक पोलिस विभागाकडून ना हरकत दाखला (NOC) घेणे आवश्यक आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज करण्याची सोय आहे. नवीन गणेश मंडळांना याच वेबसाईटवरून परवानगी घेणे बंधनकारक आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) पर्यावरणस्नेही गणेशोत्सव साजरा करण्याबाबत सूचना जारी करणार आहे.

या बैठकीत अनेक महत्वाच्या गोष्टींवर चर्चा झाली. गणेशोत्सव मंडळांना येणाऱ्या अडचणी आणि समस्यांवर तोडगा काढण्यात आला. तसेच, उत्सव शांततेत आणि नियमांनुसार पार पाडण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

महापालिकेने गणेशोत्सव मंडळांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. नागरिकांनी देखील उत्सवात सहभागी होऊन नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून शहराला स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यास मदत करावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## पातलीपाडा पुलावरील अपघातात दोघांचा मृत्यू

**ठाणे :** घोडबंदर येथील पातलीपाडा पुलाजवर मंगळवारी मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास ट्रकला झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. या अपघातामुळे पातलीपाडा पुलावरील दोन्ही वाहिन्यांवरील वाहतूक सुमारे तीन तास बंद करण्यात आली होती. ही वाहतूक सेवा रस्त्यावरून वळवण्यात आली होती. ट्रकचालक विनोद (४२) व त्याचा सहाय्यक रहीम पठाण (२५) अशी मृतांची नावे आहेत. आठ टन लोखंडी वाहिन्या व कांबी घेऊन ट्रक गुजरातच्या दिशेने जात होता. घोडबंदर येथील पातलीपाडा पुलावर येताच चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून तो विद्युत खांबावर आदळला. अपघातग्रस्त ट्रकमध्ये चालक व सहाय्यक जखमी अवस्थेत वाहनात अडकले होते.

# ठाणे शहरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना - वाहतूक विभागाच्या कार्याची नागरिकांकडून प्रशंसा

**सहसंपादक अरुण बिराजदार :** ठाणे शहरात सध्या वाढत्या वाहनांची संख्या आणि पायाभूत कामांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीला प्रतिबंध घालण्यासाठी ठाणे वाहतूक विभागाने प्रभावी नियोजन करून समाधानकारक उपाययोजना केल्या आहेत. या नियोजनामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळत असून, वाहतूक व्यवस्थापनाबाबत नागरिकांकडून कौतुक होत आहे.

ठाणे वाहतूक विभागाचे उपायुक्त श्री. पंकज सिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिलीप पाटील यांनी सकाळी ठाणे ते मुंबई आणि संध्याकाळी मुंबई ते ठाणे दरम्यान होणारी वाहतूक सुरळीत करण्यासाठी विशेष वाहतूक नियोजनाची अंमलबजावणी केली आहे.



या नियोजनांतर्गत सकाळच्या सत्रात शहराबाहेर जाणाऱ्या मार्गावर अतिरिक्त वाहन रांग व्यवस्थापन करण्यात आले असून, संध्याकाळच्या सत्रात शहरात येणाऱ्या वाहतूक मार्गावरही याच पद्धतीने रांग वाढवण्यात आली आहे. परिणामी, वाहतुकीचा गतीरोधक परिणाम कमी झाला असून, नागरिकांना वाहतूक कोंडीत अडकण्याचा त्रास टळला आहे.

दरम्यान, कोपरी परिसरात रेल्वे गर्डर टाकण्याचे महत्त्वाचे काम सुरु असूनही वाहतूक यंत्रणेने सुरळीत वाहतूक सुनिश्चित करण्यासाठी विशेष काळजी घेतली आहे.

उपायुक्त श्री. पंकज सिरसाट यांनी यापूर्वी दिलेले आठ दिवसांचे वेळबद्ध निर्देश वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दिलीप पाटील यांनी यशस्वीपणे पूर्ण करून ठाणे शहराच्या वाहतूक व्यवस्थापनात लक्षणीय सुधारणा घडवून आणली आहे.

ठाणेकर नागरिकांनी या नियोजनाचे कौतुक करताना, सर्व वाहतूक अधिकाऱ्यांनी अशाच प्रकारे सुयोग्य नियोजन करून काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

Printed by AIS Printing Solution Published by RAJENDRA KARBHARI BODAKE on behalf of RAJENDRA KARBHARI BODAKE, printed at Thane and published at NIKITA APT,PLOT NO-7/A,SHOP NO-03, SECTOR-5, KOPAR KHAIRANE, NAVI MUMBAI editor RAJENDRA KARBHARI BODAKE